# परिशिष्ट

पृष्ठ - १६३ ते १६६

# परिशिष्ट - १

## परिचय

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपूर्ण नाव | :- | श्रीमती बेबी कोंडीबा कांबळे |
| २) | जन्मदिनांक | :- | २ फेब्रुवारी १९२९ |
| ३) | पूर्ण पत्ता | :- | १६२, गोळीबार मैदान, गिरवी रोड<br>जाधववाडी पुलाजवळ, फलटण<br>जि. सातारा पिन - ४१५५२३<br>(महाराष्ट्र)<br>टेलिफोन नं. - ९५-२१६६-२२३९५५ |
| ४) | व्यवसाय | :- | पूर्ण वेळ समाजसेविका |
| ५) | कार्याचे स्वरूप | :- | १) समाजसेवा - समाजातील सर्व मुलांचे सामाजिक/आर्थिक व शैक्षणिक दर्जा उंचावण्याकरिता कार्यरत.<br>२) साहित्य - वर्तमानपत्रे/मासिके मधून कविता व लेख इ. लेखन<br>३) बालमजूर - जे पालक कामधंदया निमित्त त्यांचे मुलांना शिक्षण देऊ शकत नाहीत त्यांचेसाठी कार्य.<br>४) शिक्षण - विशेषत: भटक्या व विमुक्त जातीजमातीमधील व इतर मागासवर्गीय मधील जे पालक त्यांचे शिक्षण देवू इच्छितात त्यांचेकरिता |

भरीव कामगिरी. तसेच निरक्षर लोकांच्या मनामध्ये त्यांचे मुलासाठी शिक्षणाचे महत्व पटवून देणे.

५) घरकाम करणाऱ्या स्त्रियांसाठी घर स्वच्छ व नीटनेटके ठेवणे, स्वच्छ राहणे, चांगले बोलणे व आरोग्याची काळजी घेणे इ. प्राथमिक गोष्टींची माहिती देणे.

६) स्त्रियांच्या आर्थिक गरजा भागविणेसाठी 'बचतगट' ची स्थापना

७) शेतीमधून नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून छोटे शेतकरी व शेतमजूर ज्यांना जादा पिक घेण्याविषयी सल्ला शेतकऱ्यांना छोटया स्वरूपात डेअरी/पोल्ट्री इ. धंदयाविषयी उद्युक्त करणे.

६) समाजातील दुर्बल घटकाकरिता मागील १० वर्षामध्ये केलेले भरीव कार्य अथवा सहभाग –

मी महात्मा फुले प्रसारक मंडळ द्वारा संचलित शाळेची संचालक आहे. या संस्थेतर्फे अनुसूचित जातीजमाती व भटक्या विमुक्त जमातीतील मुलांना शिक्षण देण्याचे काम चालते. दारिद्र्यरेषेखालील लोकासाठी घरकुल योजनेअंतर्गत घरे मिळवून दिली. तसेच आश्रमशाळाही सुरू केली आहे.

७) जीवनात परिणामकारक विचारात घेण्यासारखे प्रसारित केलेले लेखन –

मी कोणत्याही शाखेची पदवीधर नाही. मी फक्त ५ वी पास आहे. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषणांनी व विचारांनी माझ्यामध्ये

आमूलाग्र बदल झाले व माझे पूर्ण जीवन बदलून गेले. माझ्यात पुस्तकवाचनाची आवड निर्माण झाली. जीवनात मी जे अनुभवले, पाहिले तेच मी लिहिले व पुस्तकरूपाने १९८६ साली 'जिणं आमुचं' या नावाने प्रकाशित केले. तसेच २००५ साली 'मन बोलतं' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला.

८) विशेष उल्लेखनीय पुरस्कार :-

मला बरेच पुरस्कार मिळाले. त्यापैकी पददलितांसाठी कायमस्वरूपी कार्यरत असलेल्या महत्वाच्या संस्थांकडून प्राप्त आहेत. 'महाराष्ट्रकन्या' या महाराष्ट्राच्या उभारणीत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांच्या पुस्तकामध्ये विशेष स्थान दिलेले आहे. जरी मी उच्च शिक्षित नसले तरी माझ्या पुस्तकाचा समावेश मराठवाडा विद्यापीठाने एम.ए.च्या अंतिम वर्षाच्या समाजशास्त्र विभागासाठी ठेवलेले आहे. त्याचप्रमाणे दिल्ली राज्याच्या शिक्षण विभागाने काही भाग छायाचित्रासहित इयत्ता ८ वी च्या पुस्तकात 'हमारा समाज हमारा राज' या नावाने समाविष्ट केलेले आहे.

९) साहित्यिक व सामाजिक क्षेत्रातील कार्यामुळे मिळालेले पुरस्कार

| अ.नं. | पुरस्काराचे नांव | कोणातर्फे | वर्षे |
|---|---|---|---|
| १. | यशवंतराव चव्हाण साहित्य पुरस्कार | महाराष्ट्र राज्य साहित्य परिषद | १९८६-८७ |
| २. | Adult literature Puraskar | महाराष्ट्र शासन | १९९० |
| ३. | दलित मित्र पुरस्कार | महाराष्ट्र शासन | १९९२-९३ |
| ४. | Special executive officer | महाराष्ट्र शासन | १९९६ |
| ५. | आदर्श माता | छत्रपती राजमाता साईसाहेब | १९९८ |
| ६. | दलित महिला | विकास वंचित दलित महिला परिषद, महाड | १९९८ |
| ७. | मातोश्री भीमाबाई आंबेडकर पुरस्कार | संबोधी परिसाधना, सातारा | २००१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | स्वंयसिध्दा महिला पुरस्कार | स्वंयसिध्दा महिला संस्था, फलटण | २००३ |
| ९. | राजर्षी शाहू महाराज साहित्य गौरव | मराठी साहित्य परिषद | २००६-२००७ |
| १०. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार | फ्रेंडस् फॉर एज्युकेशन (अमेरिका) | २००८-२००९ |

## परिशिष्ट - २

### ग्रंथ

'जिणं आमुचं' आत्मकथन - रचना प्रकाशन, वेदविद्या मुद्रणालय पुणे १ ली आवृत्ती १९८६

'मन बोलतं' काव्यसंग्रह - शामराव अहिवळे.
अस्मिता ऑफसेट,
११५ अ, मंगळवार पेठ, फलटण
४१५ ५२३. आवृत्ती पहिली.
मार्च २००५

BA... LIBRARY
SHIVA... UR.